राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ

RASHTRASANT
TUKADOJI MAHARAJ
NAGPUR UNIVERSITY

(Established by Government of Central Provinces Education Department by Notification No. 513 dated the 1st August, 1923 & presently a State University governed by Maharashtra Public Universities Act, 2016)

संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ ) (Director, Examination & Evaluation

Pariksha Bhawan, L.I.T. Premises, Amravati Road, Nagpur- 440 033

# RASHTRASANT TUKADOJI MAHARAJ NAGPUR UNIVERSITY

## FAQ – PART – 2

## विद्यार्थ्यांचे परीक्षेसंबंधिच्या प्रश्नांचे उत्तरं

प्र. १. मला परीक्षेसंबंधी किंवा परीक्षा App संबंधी अडचण किंवा मदत लागल्यास मी कुणाशी संपर्क साधावा?

उत्तर: परीक्षे संबंधी काहीही अडचण आल्यास आपल्या प्राचार्यांशी संपर्क साधून समस्या सोडवण्यास विनंती करावी. प्राचार्य विद्यापीठ यंत्रणेमार्फत आपली समस्या सोडवतील आणि आपणास कळवतील.

प्र. २. मी भौतिक अपंग (Physically Challenged) आहे. मला परीक्षेत एक्स्ट्रा वेळ मिळेल का?

उत्तर: हो. आपल्या दिव्यांगाबद्दलची माहिती परीक्षेच्या फॉर्ममध्ये दिलेली असेल तर आपणास २० मिनिटे जास्तीचे मिळेल. तसेच अंध किंवा दिव्यांग विद्यार्थ्यांना लेखनिकसुध्दा नियमानुसार देता येईल.

प्र. ३. मी काही कारणास्तव ऑनलाईन परीक्षा देवून शकलो नाही किंवा काही विषयांची परीक्षा देवू शकलो नाही तेंव्हा काय पर्याय राहील?

उत्तर: जर अशी परिस्थिती आली तर ऑफलाईन (परीक्षा केंद्रात जावून पेन आणि पेपर) पध्दतीने परीक्षा देता येईल. त्याचे वेळापत्रक सर्व ऑनलाईन परीक्षा संपल्यावर जाहीर करण्यात येईल. सोडविलेल्या उत्तरपत्रिका तपासल्यानंतर त्यांचे निकाल जाहीर करण्यात येईल. यामध्ये ऑफलाईन परीक्षेचे निकाल लागण्यात उशीर होण्याची संभावना राहील.

प्र. ४. माझा मोबाईल नंबर महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडून अपडेट केल्यानंतर नवीन एडमिट कार्ड डाऊनलोड करु शकतो का?

उत्तर: हो. करता येईल. पण जर डाऊनलोड झाले नाही तर काळजी करु नये. OTP नवीन नंबरवर येतो का ते बघावे आणि त्याचा वापर करुन Mock test (सराव) टेस्ट देवून कन्फर्म करुन घ्यावे. त्यातही काही अडचण आल्यास आपल्या प्राचार्यांशी संपर्क साधून समस्या सोडवण्यास विनंती करावी. प्राचार्य विद्यापीठ यंत्रणेमार्फत आपली समस्या सोडवतील आणि आपणांस कळवतील. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर Online Exam admission card download link दिलेली आहे, या Link द्वारे Admission Card मिळेल.

प्र. ५. मला परीक्षा App नेहमी अपडेट करीत रहावे लागेल का?

उत्तर: हो. विद्यार्थ्याने Google Playstore वरुन App ची अपडेट दररोज करुन घ्यावे.

प्र. ६. मी अंतिम वर्षाच्या अंतिम सत्रात उन्हाळी २०२० वैकल्पिक विषयाचे नांव ( Name of Elective Subject) परीक्षा देतेवेळी बदलू शकता का?

उत्तर: हो. परंतु बदललेल्चया विषयाचे अंतर्गत गुण ( College internal mark) महाविद्यालयाने पाठविलेले असावे. सर्व Elective विषय आपणास परीक्षेदरम्यान उपलब्ध असतील.

प्र. ७. ऑनलाईन परीक्षेत पेपर सोडविल्यावर पेपर सबमिट ( Submit) होवू शकला नाही तर काय करायचे?

उत्तर: परीक्षेदरम्यान नेटवर्क गेल्यावर सुध्दा प्रश्नपत्र सोडवणे शक्य होईल. जेंव्हा नेटवर्क येईल तेंव्हा सोडवलेली प्रश्न पत्रिका अपलोड करता येईल. परंतु सोडवलेल्या सर्व प्रश्नाचे उत्तरं दोन तास उशिरा पर्यंत नेटवर्क आल्यावरही पेपर अपलोड होत नसेल तर एका कागदावर वरती रोल नंबर, कोर्स, विषय आणि मोबाईल नंबर लिहून एका खाली एक प्रश्न क्र. समोर खऱ्या उत्तराचे पर्याय ( correct option) लिहून, त्याचे फोटो काढून दिलेल्या व्हॉट्सअॅप नंबर आणि इमेल वर त्वरित पाठवावे.

प्र. ८. ऑनलाईन परीक्षा दिल्यानंतर कला ऑफलाईन परीक्षेला बसता येईल का?

उत्तर: नाही.

प्र. ९. परीक्षेतील गैरप्रकारावर कसे नियंत्रण राहणार आहे?

उत्तर: नक्कीच नियंत्रण राहणार आहे. परीक्षा App वद्यार्थ्यांच्या हालचाली, आवाज आणि फोटो सतत रेकॉर्ड करीत राहील. सॉफ्टवेअर अशा विद्यार्थ्यांना वेगळे करेल आणि विजीलंस कमिटी अशा प्रकरणावर निर्णय घेवून कार्यवाही करेल. याची सर्वांना जाणीव असावी आणि गैरप्रकारापासून दूर रहावे. गैरप्रकार करतांना आढळल्यास नियमानुसार कार्यवाही होईल.

प्र. १०. परीक्षा कशी सुरु करायची?

उत्तर: वेळापत्रकानुसार विद्यार्थी ठराविक वेळेच्या ५ मिनिटा अगोदर एप ओपन करेल. त्यानंतर दिलेल्या वेळेवर लॉगीन करुन पेपर लोड होईस्तोवर वाट बघावी. पेपर लोड झाल्यावर एक तासात २५ प्रश्न सोडवायची आहे. एक तासानंतर सबमिट बटन दाबायची आहे.

प्र. ११. परीक्षा २५ पेक्षा जास्त प्रश्न सोडवता येईल का?

उत्तर: हो. परंतू मार्क फक्त पहिल्या बरोबर असलेल्या २५ उत्तराच्या आधारावर राहील.

प्र. १२. Admission card वर Login ID व Passward मध्ये चुक झाल्यास काय करावे?

उत्तर: Login ID आणि Passward हे दोनही Case sensitive आहेत त्यामुळे अचुक असाणे गरजेचे आहे. आपला Passward बरोबर असल्याची खात्री करुन घ्यावी.

सदर प्रश्न विद्यार्थ्यांच्या माहितीकरिता विद्यार्थ्यांद्वारे वारंवार विचारलेल्या प्रश्नासोबत निगडीत असून संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांनी दिलेली आहे.